**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ४०/२०२३ मधील नि.क्र. १ वरील आदेश**

CNRNOMHSN07000333

प्रस्तुतच्या अर्जामध्ये अर्जदार यांनी नि.क्र. ३९ वर पुरसीस दाखल केली असून त्याप्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार यांच्या दरम्यान तडजोड झालेली असून त्याप्रमाणे गैरअर्जदार याने अर्जदारास टप्प्याटप्प्याने रक्कम रुपये २,६०,०००/– देण्याचे ठरले होते. त्यापैकी शेवटचा टप्पा विवाहविच्छेदन अर्ज आदेशासाठी ठेवल्यानंतर देण्याचे ठरले होते. आजरोजी अर्जदार व जाबदार त्यांच्या विधीज्ञांसह न्यायालयासमोर हजर आहेत. त्यांनी नि.क्र. ४१ वर संयुक्त पुरसीस सादर करुन नि.क्र. ३९ कडील तडजोड पुरसीस नुसार पूर्ण रक्कम अर्जदार हिस मिळाली असून सर्व अटी व शर्थींचे पालन झाले असल्याने अर्जदार हिची कोणतीही रक्कम मागणी राहिलेली नाही. सबब प्रकरण निकाली काढण्यासाठी कळविले आहे.

०२. अर्जदार व जाबदार यांनी मजकूर व सहया मान्य केल्या. अर्जदाराने केलेल्या अर्जाप्रमाणे मागणी पूर्ण झाली असल्याने अर्जदारास अर्ज काढून घेण्याची परवानगी देणे उचित होईल. सबब आदेश–

**आ दे श**

नि.क्र. ४१ वरील अर्ज काढून घेण्याच्या पुरसीस नुसार प्रकरण बंद करण्यात येते.

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.05.02 16:07:44 +0530

दि.०२.०५.२०२६

**( एम. ए. कुलकर्णी)**

प्र.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

कवठेमहांकाळ